# खनिज विकास कार्यक्रम

सदर कार्यक्रमातून खनिजाच्या वाहतुकीने बाधित किंवा खनिज खाणीच्या २५ कि.मी. परिसरातील कामे प्रस्तावीत करता येतात. प्राधान्याने खनिज वहातूकीसाठी रस्ते सुस्थितीत असणे जरुरीचे असलेमुळे रस्त्याची कामे प्रस्तावित व मंजुर करता येतात.

लोकप्रतिनीधींच्या मागणीनुसार सदर रस्त्याचे प्रस्ताव तयार करून जिल्हाधिकारी, खनिकर्म विभाग, जिल्हा कोल्हापूर यांचेकडे पाठविला जातो. त्यांचे कडून छाननी होवून खनिज विकास महामंडळ, नागपूर यांचेकडे सादर केला जातो व सदर प्रस्तावास उद्योग,उर्जा व कामगार विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई यांचेकडून अंतिम प्रशासकिय व वित्तीय मंजुरी मिळते.